नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०१/२०२५ (मंगळवार) सकाळ**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे वेलतूरः– दिनांक १३/०१/२०२५ चे १६.३० वा. ते १७.०० वा. दरम्यान पो. स्टे. वेलतूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय खबर मिळाली की, एका पिकअप वाहनामध्ये जनावरे आंभोरा वेलतूर मार्ग सिल्लीकडे जनावरे कत्तलीकरीता घेवुन जात आहे. अशा माहिती वरून वेलतूर बस स्टॉप येथे नाकाबंदी केली असता एक बोलेरो पिकअप वाहन क्र. एम.एच ३६ एए ००३२ ही जनावरे घेवुन वेलतुर वरून पंचखेडी कडे जात असताना दिसल्याने सदर गाडीचा दुचाकीने पाठलाग करून खैरलांजी गावाजवळ वाहनास थाबविले. सदर वाहनाचे चालकास नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव **पराग धनराज वैदय वय २८ वर्ष रा. आकोट ता. पवनी जिल्हा भंडारा** असे सांगीतले तेव्हा त्याचे वाहनाची पाहनी केली असता वाहनाच्या पाठीमागे गोवंश जातीचे पूर्ण वाढ झालेले ३ गाई लाल रंगाचे, १ बच्चा लाल रंगाचा १ बच्चा लाल पांढ–या रंगाचे अत्यंत दाटीवाटीने बांधुन ठेवल्याचे दिसले. त्यांना कसल्याही चारा व पाण्याची व्यवस्था केलेली नव्हती. त्यावेळेस चालकास जनावरे कोणाचे असल्याचे व कुठुन आणले असे विचारले असता त्याने सांगीतले की, मासळ ता. लाखांदूर जिल्हा भंडारा येथुन **अतुल लांजेवार रा. सिल्ली व रवि सोनसरे** रा. सिल्ली याने जनावरे भरून दिली व सिल्ली ता. कुही जिल्हा नागपुर येथे घेवुन जाण्यास सांगीतले. आरोपीकडुन बोलेरो पिकअप वाहन क्र. एम.एच ३६ एए– ००३२ किंमती ३,००,०००/–रू. वाहनामध्ये ३ गाई लाल रंगाचे, १ बच्चा लाल रंगाचा १ बच्चा लाल पांढ–या रंगाचे असे किंमती अदाजे ४५०००/–रू. जनावरे असा एकुण ३,४५,०००/–रु. चा माल जप्त करुन आरोपी यांचे विरूद्ध कलम ११(१)(ड) प्रा. छ. प्रति. अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

## खुन करणाऱ्या आरोपीस अटक

**पोस्टे कुही:–** दिनांक १२/०१/२०२५ रोजी फिर्यादी नामे– अंकीत तुळशीराम बिसेन, वय २० वर्ष, रा. केशव धामणा ले–आउट, प्लॉट नं. ०७, ता. जि. नागपुर हा मृतक नामे– तुळशीराम मानिकलाल बिसेन,वय ५५ वर्ष, रा. केशव धामणा ले–आउट, प्लॉट नं.०७, ता. जि. नागपुर याचा लहाण मुलगा असुन फिर्यादी हा मित्रांसोबत पिपळा फाटा नागपूर येथे चायटपरीवर हजर असतांना **आरोपी नामे– जितेंद्र तुळशीराम बिसेन,वय २२ वर्ष,रा.केशव धामणा ले–आउट, प्लॉट नं.०७, ता. जि. नागपुर** मोठा भाऊ याचा फोन आला व वडील दारू पिवुन आहेत मी त्यांना मारून टाकतो असे म्हणाला असता तेंव्हा फिर्यादी याने आरोपीला फोनवर समजवण्याचा प्रयत्न केला व काही वेळाने घरी जावुन पाहीले असता यातील मृतक हा घराच्या समोर पडुन होता तेंव्हा फिर्यादीने हात लावुन व छाती दाबुन उठविण्याचा प्रयत्न केला परंतु मृतकाने कोणतीही हालचाल केली नाही मृतकच्या गळयावर, डोक्यावर, डाव्या हाताच्या बोटाला जखमा होत्या व रक्त निघत होते त्यांनतर फिर्यादीचे मानलेले भाउजी किशोर तेलंग यांनी फिर्यादीला सांगीतले की, तुझा मोठा भाऊ यातील आरोपी मोठा भाऊ याने तुझ्या बापाला लाताबुक्याने व काठीने डोक्यावर मारहाण केली असे सांगीतले. आरोपीविरूद्ध पोस्टे कुही येथे कलम १०३(१) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीस कुही पोलीसांनी अटक केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर